# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे.

## राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा

**सन**

२०२२-२०२३

## स्पर्धा गट-पूर्व प्राथमिक गट

# नवोपक्रमाचे नाव :- क्षमता विकास वर्ग.

**नवोपक्रमकर्त्या शिक्षकाचे नाव :- सौ. अस्मिता धर्मराज ठिकणे.**

**पत्ता :-** मु.पो.अ.लाट, पाटील नगर -४१६१४३ ता.शिरोळ, जि. कोल्हापूर.

E-MAIL ID :- thikaneasmita@gmail.com

**मो.क्र.:-** ८६९८८३२८६६

**शाळेचे नाव :- सेवा भारती संचलित, माधव शिशु मंदिर, इचलकरंजी.**

**पत्ता :-** वार्ड.नं. २२, घर नं. ५३ / १, हातकणंगले रोड,

स्टेशन नाक्याजवळ, गणेशनगर – इचलकरंजी – ४१६११. ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

Udise No. २७३४०३०८५०८

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | नवोपक्रम तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | नवोपक्रम कर्त्याचा परिचय | १ |
| २ | प्रतिज्ञापत्र | २ |
| ३ | प्रमाणपत्र | ३ |
| ४ | प्रास्ताविक | ४-५ |
| ५ | नवोपक्रम शीर्षक | ६ |
| ६ | नवोपक्रमची गरज, महत्व, वेगळेपण व फायदे | ७-८ |
| ७ | नवोपक्रमाची उद्दिष्टे | ९ |
| ८ | नवोपक्रमाचे नियोजन | १०-३६ |
| ९ | नवोपक्रमाची  कार्यपद्धती | ३७-४० |
| १० | नवोपक्रमाची यशस्विता | ४१-४२ |
| ११ | समारोप | ४३ |
| १२ | संदर्भ व परिशिष्टे | ४४ |

# नवोपक्रम कर्त्याचा परिचय



**नाव :-** सौ. अस्मिता धर्मराज ठिकणे

**जन्म ता :-** २५ मे १९८६

**मो.नं. :-** ८६९८८३२८६६

**E-Mail ID :-** thikaneasmita@gmail.com

**कायमचा पत्ता :-** मु.पो. अब्दुललाट, पाटील नगर, ता.शिरोळ, जि. कोल्हापूर, पिन को. ४१६१४३.

**शैक्षणिक अर्हता :-** HSC, D.El.Ed.

**अनुभव :-** हंगामी साखर शाळा ९ वर्षे.

सुकन्या किशोरी प्रकल्प ३ वर्षे.

**शाळेचे नाव :-** सेवा भारती संचलित माधव शिशु मंदिर, इचलकरंजी.

**पद :-** मुख्याधापिका

**नवोपक्रम विषय :-** सर्वांगीण विकास.


**शीर्षक :-** क्षमता विकास वर्ग.

( क्षमतांचा विकास म्हणजेच खरे बालशिक्षण )

**गट :-** पूर्व प्राथमिक गट.

मोठागट ( क्षमता विकास वर्ग )

# प्रतिज्ञापत्र



प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीम/डॉ. सौ. अस्मिता धर्मराज ठिकणे प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला क्षमता विकास वर्ग


हा नवोपक्रम माझ्या स्वतःच्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वतःला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

AThikane
स्पर्धकाची स्वाक्षरी

दिनांक : 3/10/2022
स्थळ : इचलकरंजी

नाव : सौ. अस्मिता ठिकणे
शाळेचा /कार्यालयाचा शिक्का.
माधव शिशु मंदिर
इचलकरंजी

# प्रमाणपत्र



प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीम/डॉ. सौ. अस्मिता धर्मराज ठिकणे हे माझ्या शाळेत / कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला क्षमता विकास वर्ग

हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये त्यांनी स्वत: राबविलेला असून ती त्यांच्या स्व परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : 31/01/2022

स्थळ : इचलकरंजी.

शाळा/ कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

नाव :

शिक्का:

सचिव, अध्यक्ष,
शालेय व्यवस्थापन समिती,
माधव विद्यामंदिर, इचलकरंजी.

# प्रास्ताविक

आदरणीय मान्यवर ;

सस्नेह वंदे।

माझा नवोपक्रम आपणासमोर सादर करण्यापूर्वी माझे मनोगत, माझे दोन शब्द आपणासमोर मांडू इच्छिते.

आत्ताचे " बाल शिक्षण हे मुलांना भरपूर संधी उपलब्ध करुन देणारे तसेच जिज्ञासा, कुतूहल, निरीक्षण या उपजत प्रवृत्तींना वाव देणारे " असे असावे. या मेंदू आधारीत नवविचारांना प्राधान्य देवून त्याप्रमाणे क्षमता विकास वर्गाची रचना करण्यात आली आहे. मुलांच्या क्षमता आणि शारीरिक, मानसिक, बौद्धिक सामाजिक, भाषिक, आत्मिक विकास लक्षात घेऊन विषयांची मांडणी करण्यात आली आहे. जसे प्रत्यक्ष स्वयंपाकाला फारसा वेळ लागत नाही परंतू त्याच्या पूर्वतयारीचे नियोजन मात्र नीट करावे लागते अनौपचारिक शिक्षणाची पूर्व तयारी उत्तम झाली की प्रत्यक्ष औपचारिक शिक्षण व्हायला वेळ लागत नाही. पण काही ठिकाणी असे आढळते की. शिक्षक, पालक, संस्थाचालक यांची मूळ भूमिकाच चूकीची असते प्राथमिक शिक्षणापूर्वीचे शिक्षण म्हणजे प्राथमिक शिक्षणाचाच एक भाग समजून ते लेखन वाचनाची सक्ती लहान वर करतात वास्तविक ही चूकीची गोष्ट आहे. लेखनाच्या दृष्टीने पाहता मुलांच्या मनगटातील सहा हाडे ही वयाच्या सातव्या वर्षापर्यंत सबल होतात. त्यानंतर त्यांना दोन ओळीत लिहण्याची क्षमता प्राप्त होते याचाच अर्थ यापूर्वी त्यांना लेखन शिकवणे हे अनैसर्गिक आहे. औपचारिक शिक्षणात जे शब्द, जी वाक्ये ही मुले लिहणार त्यांचा संबोध मेंदूला होणे ही अत्यावश्यक बाब आहे. उदा- आंबा, लिंबू, बाग, विहीर, फुले,देऊळ, झाड, वेल, हे शब्द मुलांना नुसतेच बोध न होता अनुलेखनाने लिहले तर त्यांचे शिक्षण झाले असे आपल्याला म्हणता येणार नाही. आंबा म्हणताक्षणी आंब्याचा रंग, चव, आकार त्याचे वैशिष्ट या सगळयाची प्रतिमा मुलांच्या डोळयासमोर उभी राहिल. तेंव्हाच त्याचे खरे शिक्षण होईल. पाठ्यपुस्तकातील शब्द वाचनात येण्यापूर्वी पूर्व प्राथमिक मध्ये चित्रांद्वारे, प्रत्यक्ष पाहून, शक्य असल्यास ती वस्तू हाताळून वेगवेगळया प्रकारे बालकाने त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेला असला की मग औपचारिक शिक्षण प्रत्यक्ष शिकणे ही प्रक्रिया अत्यंत सोपी होते.

मुलांमध्ये असलेली जिज्ञासा, कुतूहल, निरीक्षण, नवनिर्माण प्रवृत्ती यांना 4 ते 6 या वयात म्हणजेच पूर्वप्राथमिक मध्ये भरपुर खतपाणी मिळायला हवे विविध स्वरुपाचे अनेक खेळ, अनेक कृती, परिसराचे प्रत्यक्ष अनुभवातुन ज्ञान, बडबड गीते, संवाद, मातीकाम, चित्रकाम, हस्तव्यवसाय, प्रत्यक्ष जीवनातील अनुभव कृती यांच्या सुयोग्य संधी प्राप्त झाल्या आणि कुटुंबाचे प्रेम भरपूर प्रमाणात मिळाले तर मुलांची वाढ आणि विकास हा निकोप होईलच यात शंका नाही. मुलांच्या शिक्षणात खेळ व खेळात शिक्षण हवे ते आनंददायी असावे, विकासाला पोषक असावे, हाच विचार या उपक्रमात केला आहे. उपजतच असलेल्या प्रेरणांना म्हणजेच धावणे, उडया मारणे, नाचणे, खेळणे, बागडणे, लोंबकळणे यांना शास्त्रीय स्वरूप देऊन- पूर्वप्राथमिकमध्ये या प्रेरणांची तृप्ती विधायक

पदधतीने  केली आहे. थोडक्यात पूर्व प्राथमिक शिक्षण हे प्राथमिक शिक्षणाचाच एक भाग नसून शिक्षण प्रक्रियेतील एक स्वतंत्र टप्पा आहे याची सर्वानीच नोंद घेतली पाहिजे यासाठी क्षमता विकास वर्ग हा नवोपक्रम मी हाती घेतला आहे हा उपक्रम आपल्याला नक्कीच आवडेल अशी आशा करते.

नवोपक्रम शीर्षक

# क्षमता विकास वर्ग

( क्षमतांचा विकास म्हणजेच खरे बालशिक्षण )

# नवोपक्रमाची गरज, महत्व, वेगळेपण व फायदे

## गरज :-

- सध्या पूर्व प्राथमिक वर्गात शिकत असणाऱ्या बालकांचे बालपनाचे या पूर्वीचे दिवस कोविडच्या लॉकडाऊन काळात गेले आहे. सर्वत्र बंद असल्यामुळे बालकांचा बाहेरील जगाशी सबंध आला नाही. त्यामुळे त्यांच्या क्षमतांचा फारसा विकास झालेला नाही. त्यामुळे शाळेत बालकांच्या क्षमतांच्या विकासवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. त्यासाठी क्षमता विकासांवर आधारित उपक्रम घेणे आवश्यक आहे.

- पालक हे आपल्या पाल्याच्या भावी काळातील स्पर्धेच्या युगाची काळजी करतात व त्यांना अपेक्षित आहे की माझे मूल काय व किती लिहते आहे याचाच अर्थ असा की, अभ्यास म्हणजे फक्त आणि फक्त लेखन करणे अशी पालकांचे गैरसमजूत आहे ही गैरसमजूत दूर करण्यासाठी क्षमता विकासांवर आधारित उपक्रम घेणे आवश्यक आहे.

- शरीर,मन,आत्मा,प्राण व बुद्धि हे व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचे पैलू आहेत यांच्या साहय्यानेच व्यक्तिजीवनात व्यवहार करतो म्हणूनच यांची सार्वत्रिक क्षमता वाढवणे गरजेचे आहे.

- ० ते ६ वयोगटापर्यंत बुद्धीचा ९०% विकास होतो पण त्यासाठी बालकांकडून कृतीयुक्त उपक्रम करुन घेऊन त्यांना प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान देऊन क्षमतांचा विकास करणे गरजेचे आहे.

- आईच्या मायेच्या सावलीत वाढलेली ही बालके सुरुवातीच्या काळात शाळेत रमत नाहीत त्यांना शाळेची आवड नसते म्हणून वेगवेगळया माध्यमातून कृतियुक्त शिक्षण देऊन त्यांच्या क्षमतांचा विकास करणे गरजेचे आहे .

## महत्व :-

शाळेमध्ये अभ्यासाबरोबर क्षमता विकासासाठी विविध उपक्रम घेणे आवश्यक आहे. कारण पूर्वप्राथमिक मध्ये क्षमतांचा विकास झाला तरच बालकाला प्राथमिक व माध्यमिक विभागात शिक्षण घेणे सोईचे व सोपे होते. भोजनामध्ये मीठ नसेल तर त्या भोजनाला स्वाद येत नाही तसेच क्षमतांचा विकास झाला नसेल तर मानवाला जीवनात सहज व्यवहार करता येत नाही म्हणजेच मानवी जीवनात क्षमता विकासाला अनन्यसाधारण महत्व आहे, म्हणूनच क्षमता विकास वर्ग सुरु केला. क्षमता विकास वर्ग बालकांना त्यांच्या क्षमताचा विकास करण्यासाठी वाव देतो त्यामुळे त्यांच्या अनेक क्षमतांचा विकास होतो, त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळतो. शाळेविषयी आवड, प्रेम, आकर्षण, आपूलकी निर्माण होते. म्हणूनच पूर्वप्राथमिक शाळेमध्ये क्षमता विकास वर्ग असणे महत्वाचे आहे असे मला वाटते.

## वेगळेपण :-

- बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेमध्ये छोट्या पोहण्याच्या तलावाची व्यवस्था केली. पोहण्याच्या तलावामध्ये बालके मनसोक्त खेळण्याचा आनंद घेतात त्यातून त्यांचा सर्वांगीण विकास झाला.
- बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी छोटी विहीर बनवण्यात आली त्या विहरीवर पाणी काढण्यासाठी रहाट बसवली. बालकांचा सुरक्षिततेचा विचार करुन विहरीवर लोखंडी जाळी बसवली शाळेतील विहरीमुळे विहीर ही संकल्पना सर्वार्थाने व सर्वांगाने अनुभवता आ ली.
- स्वयंपाक घर हीच प्रयोग शाळा या विचाराने  शाळेमध्ये घर व्यवस्था करण्यात आली. या व्यवस्थेमध्ये स्वयंपाक घरातील भांड्यांचा समावेश करण्यात आला तसेच बाळाचे कपडे यांचा ही समावेश करण्यात आला. घरी स्वयंपाक घरात बालकांना प्रवेश दिला जात नाही त्यांची लुड-बुड घरातील मोठ्या लोकांना नकोशी असते पण बालकांच्या या त्यांची लुड-बुडीतूनच त्यांचा विकास होतो हे लक्षात घेऊन शाळेमध्ये घर व्यवस्था केली व बालकांच्या क्षमतांचा विकास केला.

## फायदे :-

- क्षमता विकास वर्गात घेत असलेल्या कृतीयुक्त उपक्रमामुळे मुलांच्या मनात शाळेविषयी आवड निर्माण झाली.
- घेतलेल्या उपक्रमाविषयी मुले घरी जाऊन आपल्या पालकांना सांगू लागली त्यामुळे पालकांना उपक्रमाचे महत्व पटले.
- रोज वेगवेगळे उपक्रम घेतल्यामुळे मुलांच्या मनातील उपक्रमा विषयी उत्सुकता वाढली.
- शाळेत घेतलेला उपक्रमामुळे मुले घरातही असे उपक्रम करू लागली त्यामुळे मुलांची एकाग्रता वाढण्यास मदत झाली.
- शाळेत एक तास घेतलेल्या उपक्रमामुळे मुले दिवसभर घरात गुंतून राहू लागली.
- क्षमता विकास वर्गामुळे मुलांचा शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक, बौद्धिक विकास झाला.
- सर्व क्षमतांमध्ये सफाई वेग वाढला.
- सर्व मूले उपक्रमात आनंदाने सहभागी होऊ लागली.
- बालकाच्या सुप्त गुणांना वाव मिळाला.

# नवोपक्रमाची उद्दिष्टे

- बालकांच्या कल्पनाशक्तिला वाव देऊन स्वनिर्मितीचा आनंद देणे.
- खेळ, घनिष्ठ अनुभव, जीवन व्यवहार, कौशल्य विकास, बागकाम, बालकसभा या सर्वामधून बालकांचा सर्वांगीण विकास करणे.
- बालकांच्यामध्ये एकाग्रता वाढविणे.
- श्रध्दा, भक्ती, संघटन, शिस्त, संयम, संगीत, संस्कृत, योग इत्यादी संस्कार देणे.
- विद्यार्थ्यांना क्षमता विकास वर्गात वारंवार येणे,क्रियाकलाप करणे,खेळणे या गोष्टींची आवड निर्माण करणे.
- बालकांचा मातीशी व निसर्गाशी संबंध जोडून निसर्गातील रहस्यांचा प्रत्यक्ष अनुभव देणे.
- औपचारिकपणा कमी करणे व मैत्रीपूर्ण नाते शिक्षक व बालकांमध्ये निर्माण करणे.
- लाजाळू बालकांच्या प्रोत्साहन देऊन पुढे करणे.
- अन्नमयकोश, प्राणमयकोश, मनोरमयकोश, विज्ञानमयकोश व आनंदमयकोश बालकांच्या या पंचकोषांच्या विकास करणे.
- शारिरीक, भाषिक, मानसिक,आत्मिक, बौद्धिक व सामाजिक, क्षमतांचा विकास करणे.

# नवोपक्रमाचे नियोजन

जीवनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी व जीवन व्यवस्थित जगण्यासाठी ईश्वराने आपल्याला विभिन्न प्रकाराच्या क्षमता प्रदान केल्या आहेत. या क्षमतांचा आपण योग्य पद्धतीने विकास करू शकतो. यासाठी शाळेत विविध उपक्रम राबविणे आवश्यक आहे. कारण मुलांना नेहमी काही ना काही वेगळे करावे असे वाटत असते. अभ्यासाव्यतिरिक्त मुले अन्य गोष्टींमध्ये जास्त रमतात याचाच फायदा घेऊन आपण वेगवेगळे कृतीयुक्त उपक्रम शाळेत घेऊ शकतो म्हणूनच मी संचालक व मुख्याध्यापक यांची परवानगी घेऊन क्षमता विकासासाठी विविध क्रियाकलाप घेण्याचे ठरविले. क्षमता विकास वर्ग सुरु करण्यासाठी सर्वप्रथम मी 25 मुलांचा गट तयार केला यांच्या क्षमतांचे निरीक्षण केले व या निरीक्षणावरून क्रियाकलापांची यादी तयार केली. व यादीनुसार क्रियाकलाप घेण्यास सुरवात केली. मुले क्रियाकलापात खुपच रमत होती त्यांना आवडू लागले. मुले घरी गेल्यानंतरही हेच करू लागली. काही दिवसातच पालकांच्या हे लक्षात आले व त्यांनी माझ्याशी चर्चा केली. काही पालक समंजस होते यांना क्षमता विकासाचे महत्व पटले पण काही पालक तक्रार करत होते. त्यांचे मत असे होते की अभ्यासाव्यतिरिक्त काहीतरी घेवून मी वेळ वाया घालवत आहे, यांना पटवून देणे अशक्य वाटत होते म्हणून मी यावर पर्याय म्हणून पालक मिटींग घ्यायचे ठरविले. व पालकांचाच लेखनाचा उपक्रम घ्यायचा असे ठरविले. दि. ०९/०७/२०२२ रोजी पालक मेळावा आयोजित केला. या पालक मेळाव्यामध्ये पालकांना डाव्या हाताने लिहायला सांगितले बऱ्याच पालकांना लिहता आले नाही व ज्यांनी लिहले होते ते अगदी वेडेवाकडे होते वाचता देखील येत नव्हते. यावरून हातांच्या बोटांच्या क्षमतांचा विकास पालकांना समजावून सांगितले त्याचबरोबर मुलांच्या पायांच्या, डोळयाच्या ,कानाच्या क्षमतांचाही विकास करणे अत्यावश्यक आहे हे पालकांना समजावून सांगितले या प्रयोगावरून पालकांच्या लक्षात आले की क्षमतांचा विकास झाल्याशिवाय आपले मूल व्यवस्थित व्यवहार करू शकत नाही, थोडक्यात म्हणायचे झाले तर.....

**“बालकांसाठी शिक्षण आहे,**

**शिक्षणासाठी बालक नाही.”**

## १) उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण :-

१ काही मुलांना शाळेची व शिक्षणाची आवड नव्हती.

२ शाळा म्हणजे अभ्यास एके अभ्यास अशी पालकांची समजूत होती.

३ शालेय उपक्रमाविषयी पालकांना माहिती नव्हती.

४ शाळेची गोडी नसल्यामुळे मूले शाळेत रडत होती व आईची आठवण काढत होती.

५ या बालकांचे यापूर्वीचे दिवस लॉकडाऊनमध्ये गेले आहे यामुळे त्यांचा फारसा क्षमतांचा विकास झाला नाही.

६ काही बालकांचा स्वभाव घाबरट होता.

७ मुलांच्या कृतीला घरी प्रोत्साहन दिले जात नसावे.

८ हे करू नको, ते करू नको, असे नकारार्थी शब्द मुलांना घरी बोलले जात असावे.

९ शारीरिक व्यायाम नसल्याने मुलांचा डबा संपत नाही.

१० काही मुलांच्या पौष्टीक आहाराकडे पालकांचे लक्ष नसावे.

११ काही मुलांना पाण्याची भिती होती.

१२ बागेतील झाडांची, रोपांची, फुलांची ,फळांची, वेलींची इत्यादी. नावे माहिती नव्हती.

१३ स्वनिर्मितीचा आनंद मुलांना मिळाला नव्हता.

१४ मुलांच्यामध्ये एकाग्रता क्षमता कमी होती.

## २) संबंधीत व्यक्तीशी चर्चा :-

शिशु शिक्षण हा काही मनोरंजनाचा विषय नाही तसेच तो औपचारिक शिक्षणाचाही विषय नाही ते संस्काराचे क्षेत्र आहे. जीवन विकासाचा पाया आहे. संपूर्ण जीवनामध्ये हा महत्वाचा कालखंड आहे. म्हणूनच या विषयाचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. व्यक्तिमत्व काय आहे.? व्यक्तीमत्व विकास काय आहे? विकासाची प्रक्रिया कशी आहे? संस्कार कशाला म्हणतात? संस्कार कसे होतात? या सर्व बाबी खुपच महत्वाच्या आहेत. आणि हे त्याच बरोबर मुलांमध्ये कौशल्य विकास, नेतृत्व गुण, शारीरिक विकास इत्यादी क्षमता असणे गरजेचे आहे. म्हणूनच मी शाळेचे संचालक मा.श्री. प्रकाश गणपुले, मा.श्री. नरेंद्र कुलकर्णी, मा.श्री पंकज मेहता सर यांची परवानगी घेवून क्षमता विकास वर्गाची सुरुवात केली.

## ३) आवश्यक साधनांचा विचार :-

१) मुलांच्या क्षमता विकासाचे महत्व लक्षात घेवून उपक्रमासाठी लागणारे साहित्य हे उपक्रमाशी निगडीत असेल असे घेतले.

२) साधने घेत असताना ते ओळखीचे व हाताळायला सोपे असतील असे घेतले.

३) स्थानिक परिसरात सहज उपलब्ध होणारे साहित्य निवडले.

४) जीवन व्यवहार क्रियाकलापासाठी लागणारे साहित्य खरेदी करून घर व्यवस्था, शाळेत केली. यासाठी घरातील बऱ्याच वस्तूंचा संग्रह केला. **उदा.** रवी, तांब्या, चाकू, विळती,ताट, पेला, चुल, बाळाचे कपडे, सूप, चाळणी, शिबडे इत्यादी.

५) बागकामासाठी समजणारे छोटी-छोटी हत्यारे आणली.**उदा.** खुरपे, खोरे, कुदळ, तीन नखी, पाच नखी हत्यार,छोट्या टोपल्या, छोट्या बादल्या इत्यादी.

६) बालकांना आनंददायी शिक्षण देण्यासाठी उपक्रमाची यादी तयार केली .

७) क्रियाकलापासाठी लागणारे शैक्षणिक साहित्य शिक्षकांच्या मदतीने बनविले.

## ४) करावयाच्या कृतीचा क्रम :-

१ क्षमता विकास वर्गाच्या उपक्रमाचे नियोजन केले.

२ क्षमता विकास वर्गासाठी 25 बालकांचा गट तयार केला.

३ वर्गासाठी वर्गखोली निश्चित केली.

४ क्षमतांचे महत्व पटवून देण्यासाठी पालक मेळावा घेतला.

५ उपक्रमाचे नियोजन सोप्याकडून कठीणाकडे असे केले.

६ मुलांना बोलते करण्यासाठी बालक सभेचे विषय मुलांच्या ओळखीचे दिले.


## ५) कार्यवाहीचे टप्पे :-

क्रियाकलापापासून क्षमतांचा विकास करण्यासाठी वाराप्रमाणे तक्ता.

| वेळ | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|---|
| ८.३० ते ८.५० | वंदना सभा | वंदना सभा | वंदना सभा | वंदना सभा | वंदना सभा | वंदना सभा |
| ८.५० ते ९.०० | हजेरीचा खेळ | हजेरीचा खेळ | हजेरीचा खेळ | हजेरीचा खेळ | हजेरीचा खेळ | हजेरीचा खेळ |
| ९.०० ते १०.०० | खेळकूद समारंभ | घनिष्टम अनुभव | जीवन व्यवहार | कौशल्य विकास | बाग काम | बालक सभा |

## ६) नवोपक्रमाची प्रत्यक्ष कार्यवाही

शब्द आकाशाचा गुण आहे पण वाऱ्याशिवाय त्याचा अनुभव कान घेऊ शकत नाही, गंध पृथ्वीचा गुण आहे पण वाऱ्याशिवाय त्याचा अनुभव नाक घेऊ शकत नाही तसेच प्रत्येक बालकांमध्ये एका कलाकाराचे गुण आहे पण क्षमता विकास झाल्या शिवाय आपण ते पाहू शकत नाही म्हणून बालकांच्या सर्वांगिण विकासासाठी शिशुवाटीकेत पुढील उपक्रम घेण्यात आले.




### १ वंदना सभा

सेवाभारती संचलित, माधव शिशु मंदिर मध्ये वंदनासभा हा रोजचा उपक्रम आहे.

सर्व बालके अष्टगंध कपाळाला लाऊन खडीसाखर घेऊन ओळीत वंदना सभागृहात जाऊन बसतात. समोर सरस्वती माता ,ॐ व भारत माता या तीन प्रतिमा ठेवलेल्या असतात यांचे पूजन करून दिप प्रज्वलन केले जाते. त्यानंतर सरस्वती श्लोक, सरस्वती वंदना, ध्यान, गायत्रीमंत्र, भारत मातेला वंदना आणि शांतीपाठ या क्रमाने वंदना घेतली जाते. वंदनेमुळे बालकांमध्ये अनेक क्षमतांचा विकास होतो.

१. क्षमता विकास वर्गातील ही मुले खुपच लहान आहेत त्यामुळे जास्त उशिरापर्यंत एका ठिकाणी बसण्याची यांची क्षमता विकसित झालेली नसते पण वंदनेमुळे स्थिर व एकाग्रता बसण्याची क्षमता हळू-हळू विकसित होते.

२. वंदनेमध्ये हिंदी, संस्कृत श्लोकांचा समावेश आहे त्यामुळे बालकांचा भाषिक विकास उत्तम होतो.

३. वंदनेमुळे श्रद्धा, भक्ती, समुहाने केलेले कार्य, संघटन, शिस्त, संयम ,संगीत, संस्कृत, योग इत्यादीचे संस्कार होतात.

## २. हजेरीचा खेळ

हजेरीचा खेळ रोज घेण्यात येतो यामध्ये हजेरी घेत असताना मुलांचे नाव घेतल्यानंतर त्यांनी हजर न म्हणता ठरलेल्या विषयावर आधारीत उत्तर देणे अपेक्षित असते. म्हणजेच त्यांना हजेरीपूर्वी एक विषय देण्यात येतो. जसे

| अनु.क्र. | विषय | क्षमता विकास |
|---|---|---|
| ०१ | पक्षांची नावे | पक्षांचा परिचय |
| ०२ | प्राण्यांची नावे | पाळीव व जंगली प्राण्यांचा परिचय |
| ०३ | रंगाची नावे | रंगाचा परिचय |
| ०४ | फळांची नावे | फळांची ओळख |
| ०५ | फुलांची नावे | फुलांची ओळख |
| ०६ | वाहानांची नावे | वाहानांचा परिचय |
| ०७ | वारांची नावे | वारांची नावे समजली |
| ०८ | महिन्यांची नावे | इंग्रजी व मराठी महिने परिचय |
| ०९ | तिथींची नावे | तिथींची नावे सांगता आली |
| १० | दिशांची नावे | दिशांचा परिचय |
| ११ | ऋतूची नावे | मुख्य व उप दिशा समजल्या |
| १२ | ज्ञानेंद्रियांची नावे | ज्ञानेंद्रियांचा परिचय |
| १३ | शरीराचे अवयव | शारीरिक अवयवांची नावे समजली |
| १४ | भौमितीक आकार | आकारांची ओळख |
| १५ | फळभाज्यांची नावे | फळभाज्यांची ओळख |
| १६ | पालेभाज्यांची नावे | पालेभाज्यांची ओळख |
| १७ | देवांची नावे | देवांचा परिचय |

अशाप्रकारे हजेरी घेतल्यामुळे बालकांच्या सामान्य ज्ञानात भर पडले या शिवाय एखादा बालक उत्तर चुकत असेल तर इतर बालक त्याला उत्तर सांगून मदत करतात. म्हणजे मदत करण्याचे संस्कार आपोआपच रुजवले गेले. याशिवाय बालकांचा भाषिक विकास झाला, शब्दसंपदेत वाढ झाली, वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे बालकांना आपोआपच लक्षात आली, अभ्यासाचे ओझे त्यांच्या मनावर राहिले नाही सामान्य ज्ञान हा विषय हजेरीच्या खेळातून बालकांपर्यंत पोहचला.

## ३. खेळकूद समारंभ

बालकांच्या जीवनात खेळाला अतिशय महत्वाचे स्थान आहे . खेळ म्हणजे आनंद बालक प्रत्येक काम आनंदासाठी करत असते म्हणूनच खेळामध्ये आनंदाचे तत्व कायम ठेवून बालकाचे सर्वांगीण विकास करणे महत्वाचे आहे. कारण खेळाने केवळ शारीरिकच विकास होत नाही तर मानसिक, बौद्धिक,आत्मिक विकासही होतो संघवृत्ती व खेळाडूवृत्ती निर्माण होते जीवनाचा अनुभव मिळतो व संस्कारही होतात कारण खेळ म्हणजे कृती आणि खेळ म्हणजे आनंद आणि हेच लक्षात घेवून बालकांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रत्येक सोमवारी खेळकूद हा समारंभ घेण्यात आला व विविध खेळाचे नियोजन केले.

| अ.क्र. | वार / दिनांक | उपक्रम | साहित्य | क्षमता विकास |
|---|---|---|---|---|
| १ | सोमवार ०४/०७/२०२२ | उड्यांचे प्रकार | मैदान | ससे उड्या, लांब उड्या, बेडुक उड्या, कांगारु उड्या हे उड्यांचे प्रकार समजले, सर्वांग व्यायाम झाला, खेळाची आवड निर्माण झाली . |
| २ | सोमवार ११/०७/२०२२ | सरळ रेषा, नागमोडी रेषा व भौमीतिक आकरावरुन चालणे | मैदान व चॉकपीठ | शारीरिक विकास, एकाग्रतेत वाढ, रेषेवर लक्ष केंद्रित  करण्याची क्षमता प्राप्त, भौमितिक आकारांचा परिचय. |
| ३ | सोमवार १८/०७/२०२२ | पुतळे | खंजिरी | श्रवण कौशल्य विकसित, सूचनेचे पालन करणे क्षमता प्राप्त, पायांच्या क्षमतांचा विकास. |
| ४ | सोमवार २५/०७/२०२२ | अडथळा रेस | विटा, मैदान | पायांच्या क्षमतांचा विकास, तोल सांभाळण्याची क्षमता प्राप्त. |
| ५ | सोमवार ०१/०८/२०२२ | मोजली व भरली | मनी, चिंचोके, खडे, टोकली, वर्ग | गणन क्षमतेत वाढ, गणिताची पूर्व तयारी, बौद्धिक विकास. |
| ६ | सोमवार ०८/०८/२०२२ | लिंबू चमचा | लिंबू, चमचा, मैदान | तोल सांभाळण्याची क्षमता प्राप्त, एकाग्रतेत वाढ, शारीरिक विकास. |
| ७ | सोमवार २२/०८/२०२२ | तिपाई दौड | रुमाल व मैदान | सहकार्याची वृत्ती, पायांच्या क्षमतांचा विकास, निरिक्षण क्षमतेत वाढ, शारीरिक विकास. |
| ८ | सोमवार २९/०८/२०२२ | स्मरण खेळ | खडू, डस्टर, पेन, पट्टी, पाटी, रुमाल, पेन्सिल, किल्ली, चेंडू, खोड रब्बर | निरिक्षण क्षमतेत वाढ, स्मरण शक्तिची वाढ, वस्तूंचा परिचय. |
| ९ | सोमवार १२/०९/२०२२ | बादलीत चेंडू फेकणे | बादली चेंडू | निरिक्षण क्षमतेत वाढ, नेम धरण्याची क्षमता प्राप्त, चेंडू पकडण्याची क्षमता प्राप्त, फेकण्याची क्षमता प्राप्त. |
| १० | सोमवार १९/०९/२०२२ | मासे पकडणे  ( खेळातून प्रयोग) | खेळातील मासे, टाचण्या लोह चुंबक, दोरा, टप, पाणी | निरिक्षण क्षमतेत वाढ, वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण, चिकित्सक वृत्ती वाढली, लोखंड लोह चुंबकास चिकटते हे समजले. |

## ४. घनिष्ठतम अनुभव

मनुष्याचे जीवन हे केवळ स्वत:पुरतेच मर्यादित नसून सभोवतालचे वातावरण वृक्ष-वेली, वनस्पती,पशु पक्षी,प्राणी यांच्याशी जुळलेली असते. या सर्वांशी त्याचा घनिष्ठ संबध असतो म्हणून या उपक्रमाला घनिष्ठतम अनुभव असे नाव दिले आहे.

आपले शरीर इत्तर पदार्थाप्रमाणे पंचमहाभूतांनी बनलेले आहे म्हणजेच पंचमहाभूते आपल्या आत व बाहेर आहेत आणि म्हणून पंचमहाभूतांवर आधारीत क्रियाकलाप घेऊन बालकांचा सर्वांगिण विकास करणे गरजेचे आहे. लहानपणापासूनच बालकांच्या मनात निसर्गाविषयी प्रेम निर्माण करणे गरजेचे आहे म्हणजेच येणारी भावी पिढी निसर्गप्रेमी मिळेल व पर्यावरणाचे संतूलन बिघडणार नाही हा दृष्टिकोण डोळयासमोर ठेवून पंचमहाभूतांवर आधारीत क्रियाकलापांचे नियोजन केले.

| अ.क्र. | वार / दिनांक | उपक्रम | साहित्य | क्षमता विकास |
|---|---|---|---|---|
| १ | मंगळवार ०५/०७/२०२२ | मातीचा ढिग करणे, ढिगावरुण उडीमारणे, मातीत आकृती काढणे. | माती आणि मैदान | हाताच्या स्नायुंचा विकास, पायाच्या स्नायुंचा विकास, मातीशी नाते संबध जोडले. |
| २ | मंगळवार १२/०७/२०२२ | रंगीत बाटलीत पाणी भरणे, थंड-गरम पाण्याचा स्पर्श ओळखणे. | बाटली, पाणी, भांडे, गॅस | स्पर्श ज्ञान विकसित, पाण्याशी नाते संबध जोडले, निरिक्षण क्षमता विकसित. |
| ३ | मंगळवार १९/०७/२०२२ | नाका खाली हात ठेऊन हवेचा अनुभव घेणे, झाडाची पाने हलताना पाहणे, पंखा फिरून हवेचा अनुभव घेणे. | झाड,पंखा | हवेचा प्रत्यक्ष अनुभव,स्पर्श ज्ञान प्राप्त, श्वसन व्यायाम, हवेचे अस्तित्व लक्षात आले. |
| ४ | मंगळवार २६/०७/२०२२ | सूर्य प्रकाशाचा अनुभव, रंगीत काचेतून पाहणे, सावलीचा खेळ. | रंगीत चश्मे | सूर्य प्रकाशाचा प्रत्यक्ष अनुभव, रंगांची ओळख, डोळयाच्या क्षमतांचा विकास, सावलीची ओळख. |
| ५ | मंगळवार ०२/०८/२०२२ | मातीचा नागोबा बनवणे. | माती आणि नागोबाचे साचे | कल्पना शक्तिला वाव, हातांच्या बोटांचा विकास, स्व- निर्मितीचा आनंद. |
| ६ | मंगळवार २३/०८/२०२२ | पोहण्याच्या तलावात खेळणे. | पोहण्याचा छोटा तलाव, पाणी, चेंडू | पाण्याची भिती कमी झाली, पोहल्यामुळे सर्वांग व्यायाम झाला, पाण्याचा भिजण्याचा आनंद मिळाला. |
| ७ | मंगळवार ३०/०८२०२२ | फुगा फुगविणे,पुठ्याने वारा घेणे. | फुगा ,पुठ्ठा | श्वसन क्रियेचा विकास, हवेचे अस्तित्व जाणवले, निरिक्षण क्षमतेचा विकास. |
| ८ | मंगळवार ०६/०९/२०२२ | पाण्यात चेहरा पाहणे. | पाणी, पसरट, भाडे | निरिक्षण क्षमतेचा विकास, प्रतिबिंब पाहण्यात आनंद मिळाला. |
| ९ | मंगळवार १३/०९/२०२२ | शेकोटी पेटवणे. | परिसरातील सुका कचरा, शेणी, आगपेटी | अग्नीची ओळख, उष्णतेचा अनुभव, स्पर्शज्ञान, निरिक्षण स्वच्छता इत्यादी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | मंगळवार २०/०९/२०२२ | माती, पाणी,वारा वाचवा उपक्रम. | | माती, पाणी, वारा यांचे महत्व समजले. |
| ११ | मंगळवार २७/०९/२०२२ | विहिरीतून पाणी काढणे | छोटी विहीर, रहाट, पाणी, बादली, दोरी इत्यादी | वजन उचलण्याची क्षमता प्राप्त पाण्याशी संबंध विहिरीतून पाणी काढण्याचा प्रत्यक्ष अनुभव, विहिरीतील रहाटाचा परिचय. |

## ५. जीवन व्यवहार

बालक ज्या लोकांमध्ये ज्या परिसरात, ज्या वातावरणात वाढते त्या गोष्टी आत्मसात करण्याचा प्रयत्न करतो या दृष्टीने तो अनेक प्रकारची कामे करत असतो घरातील व आजूबाजुच्या वस्तूला तो हात लावत असतो, निरिक्षण करतो त्याला जे जे करता येते ते ते तो करत असतो असे करताना ती वस्तू तुटते फुटते ही मोठ्यांची भाषा आहे पण त्याच्यासाठी ते प्रयोग आहेत.

पाच सहा वर्षाचे बालक झाडणे, पुसणे, कपडे धुणे, भाजी निवडणे दुरदर्शन वाहीनी बदलणे, सायकल चालवणे, बूट पॉलिश करणे इत्यादी कामे सवलत दिली तर करू शकते पण बालकांना कोणीही कोणतेही काम करू देत नाही. आई- वडील दोघेही या बाबतीत कडक रितीने वागतात तुला काही येत नाही, तू अजून लहान आहेस, तू माझे काम बिघडवशील असे म्हणून लहान मुलांना झिडकारतात, पण प्रत्यक्षात ही कामे बालकांच्या विकासासाठी खुपच महत्वाची आहेत.

सर्व कामे व्यवस्थित व मनमोकळे पणाने करता येण्यासाठी शिशुवाटीके मध्ये मी घर व्यवस्था निर्माण केली बालकांना त्यांच्या कामात मदत करणे हीच काम शिकवण्याची पध्दत आहे. बालक स्वत: निरिक्षण करत असते कपडे धुत असतना आईप्रमाणे बसते व आईप्रमाणे धुण्याचा प्रयत्न करते तेंव्हा या कामात मदत केली याच बरोबर दररोजच्या जीवनातील व्यक्तीगत कामे त्यांना सांगण्यात आले दात स्वच्छ करणे, गुळण्या करणे, आंघोळ करणे, कपडे घालणे , पक्षाना खाऊ घालणे ही कामे करता करता त्यांचे कौशल्य, भावना, जाणीव, संवेदना इत्यादींचा विकास झाला.

| अ.क्र. | वार / दिनांक | उपक्रम | साहित्य | क्षमता विकस |
|---|---|---|---|---|
| १ | बुधवार ०६/०७/२०२२ | चाळणे, कूटणे | चाळणे, पीठ, खलबत्ता, शेंगदाणे इत्यादी | हातांचा स्नायुंचा विकास, निरिक्षण क्षमता विकास कामातील नीटनेटके पणा. |
| २ | बुधवार १३/०७/२०२२ | सतरंजी टाकणे, झाडणे, फरशी पूसणे | सतरंजी, पाणी, बदली, कापड, झाडु इत्यादी | कार्यकुशल्यतेत विकास, कमरेच्या स्नायुंचा विकास, स्वच्छतेची सवय. |
| ३ | बुधवार २०/०७/२०२२ | स्वत:चा डबा धुणे, रुमाल धुणे | डबा, पाणी, रुमाल इत्यादी | स्वच्छतेची सवय, स्वत:चे काम स्वत: करण्याची क्षमता प्राप्त. |
| ४ | बुधवार २७/०७/२०२२ | शारीरिक स्वच्छता | पाणी, साबण, कोलगेट, तेल, कंगवा, नेलकटर इत्यादी | नीटनेटकेपणा, गुण प्राप्त, शारीरिक स्वच्छतेचे महत्व समजले. |
| ५ | बुधवार ०३/०८/२०२२ | धान्य निवडणे, धान्य पाकडणे | ताट, धान्य, सूप इत्यादी | डोळयांच्या क्षमतेचा विकास, झेलणे क्षमता प्राप्त, निवडणे व पाकडणे क्षमता प्राप्त. |
| ६ | बुधवार १०/०८/२०२२ | बटाटा सोलणे व खाणे | शिजलेला बटाटा, मीठ | बोटांच्या क्षमतेचा विकास कच्चा व शिजलेला फरक, चव ओळखणे इत्यादी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | बुधवार १७/०८/२०२२ | लिंबू सरबत करणे | भांडे, साखर, पाणी, लिंबू , मीठ इत्यादी | चव ओळखण्याची क्षमता प्राप्त, पौष्टिक पेय पिण्याचा आनंद मिळाला. |
| ९ | बुधवार २४/०८/२०२२ | कपडे घडी करणे | कपडे व साहित्य | नीटनेटकेपणा, घरी मदत करण्याचे संस्कार. |
| १० | बुधवार ०१/०९/२०२२ | पक्षांना खाऊ देणे | डब्यातील खाद्य पदार्थ, भांडे | सामजिक विकास, मदतीची भावना प्राप्त. |
| १२ | बुधवार १४/०९/२०२२ | सहभोजन | स्वत:चा डबा व पाण्याची बाटली | सामजिक विकास, मित्रांबरोबर मिळूण राहणे, वाटुन खाणे, एकीची भावना. |
| १३ | बुधवार २१/०९/२०२२ | चुलीवरील पौष्टिक खिचडी | तांदूळ, मिश्र डाळी, बटाटा, लाल तिखट, जीरे, हळद, टोमॅटो, तेल ,हिंग मीठ, कडीपत्ता, मोठे भांडे, झाकण, चमचा, चूल, जळण, आगपेटी | चुल पेटवतना प्रत्यक्ष पाहण्याचा आनंद प्राप्त, चूलीवरील पौष्टिक अन्न खाण्याचा आनंद प्राप्त, धान्यांची ओळख. |

## ६.कौशल्य विकास

ज्याप्रमाणे पुस्तकालय ज्ञानांचा केंद्र आहे प्रयोगशाळा विज्ञानाचे केंद्र आहे घर संस्कृतीचे केंद्र आहे त्याप्रमाणे कौशल्य विकास कार्यकुशल्यतेचे केंद्र आहे. व्यक्तीला कार्यकुशल बनविण्यासाठी कर्मेंद्रिये कार्यरत करण्याची गरज असते नाना प्रकारच्या कारागिरांमध्ये हाताने करण्याच्या कामामधील कौशल्य आधार भूत असते या दृष्टीने बालकांचा कौशल्य विकास करण्यासाठी पुढील क्रियाकलाप घेण्यात आले.

| अ.क्र. | वार / दिनांक | उपक्रम | साहित्य | क्षमता विकास |
|---|---|---|---|---|
| १ | गुरूवार ०७/०७/२०२२ | ओवणे | मणी, दोरा इत्यादी | डोळयांच्या क्षमतांचा विकास,बोटांचा विकास, रंगांची ओळख , कार्यकुशलतेत विकास. |
| २ | गुरूवार १४/०७/२०२२ | रंगीत कणकेचे वस्तू बनविणे. | पीठ, पाणी, तेल,खाण्याचे रंग इत्यादी | हाताच्या बोटांचा क्षमतेचा विकास, रंगाची ओळख, कल्पकतेचा विकास. |
| ३ | गुरूवार २१/०७/२०२२ | ठसे काम | भेंडी, कागद, बोटे, दोरा, कोरा कागद, रंग, प्लेट, पाणी इत्यादी | कल्पनाशक्तीचा विकास, कार्यकुशलता विकास. |
| ४ | गुरूवार २८/०७/२०२२ | दीपअमावस्या सजावट | विविध दिवे, फुले, हळदी-कुंकू, झाडांची पाने, टेबल इत्यादी | सणांचा परिचय, कौशल्य विकास, संस्कृती ओळख, दिव्यांची ओळख. |
| ५ | गुरूवार ०४/०८/२०२२ | राखी बनविणे | कापूस, पुठ्ठा, दोरा,डिंक, कागद इत्यादी | विविध वस्तूंचा परिचय, कल्पना शक्तीचा विकास, बोटांचा विकास, बुद्धीला चालना. |
| ६ | गुरूवार १८/०८/२०२२ | दहीहंडी सजविणे व दहीहंडी फोडणे | दहीहंडी, खडू, दोरा, फुले, दही इत्यादी | भारतीय सणांची ओळख, मातीच्या भांड्यांचा परिचय, सजावट कौशल्य प्राप्त, दहीहंडी फोडण्याचे कौशल्य प्राप्त. |
| ७ | गुरूवार २५/०८/२०२२ | रुमालाची घडी | रुमाल | बोटांचा विकास, एकाग्रता, स्वत: केल्याचा आनंद |
| ८ | गुरूवार ०८/०९/२०२२ | पाण्याच्या खाली रांगोळी | ताट, तूप, रंगोळी, पाणी इत्यादी. | नवनिमिर्तीचा आनंद प्राप्त, वैज्ञानिक दृष्टिकोण प्राप्त. |
| ९ | गुरूवार १५/०९/२०२२ | फुलांची रांगोळी | फुले | फुलांचे रंग, स्पर्श, आकार वास परिचय, रांगोळीत फुलांची रचना करण्याचे कौशल्य प्राप्त. |
| १० | गुरूवार २२/०९/२०२२ | फुलांचे हार बनविणे | फुले, सुई, दोरा इत्यादी. | डोळयाच्या क्षमतांचा विकास,फुलांचा परिचय, ओवण्याची क्षमता प्राप्त. |
| ११ | गुरूवार २८/०९/२०२२ | कागदाचा फटाका | कोणताही कागद | घडी घालण्याचे कौशल्य प्राप्त, श्रवण कौशल्य विकसित, बोटांच्या कौशल्यात वाढ. |

## ७. बागकाम

बालकांचा संबंध मातीशी जुळावा, निसर्गाशी जुळावा, निसर्गातील रहस्यांचा त्याला अनुभव यावा या गोष्टी त्याच्या विकासाच्या पाया प्रमाणे महत्वाच्या आहेत पूर्व प्राथमिक वर्गात बाग ही सुंदर, पवित्र, शुद्ध वातावरण निर्माण करणारी गोष्ट आहे. तसेच यामध्ये पंचमहाभुतांवर आधारित सर्व क्रियाकलाप घेणे शक्य आहे. त्यामुळे बाग काम पर्वप्राथमिक वर्गातील महत्वाचा घटक आहे.

| अ.क्र | वार / दिनांक | उपक्रम | साहित्य | क्षमता विकास |
|---|---|---|---|---|
| १ | शुक्रवार ०१/०७/२०२२ | शाळेतील बागेची पाहाणी | | निरिक्षण क्षमतेचा विकास, फिरण्याचा आनंद प्राप्त वेगवेगळ्या वनस्पतीचा परिचय. |
| २ | शुक्रवार ०८/०७/२०२२ | शाळेतील बागेची स्वछता | खराटा, पाटी, खुरपे, कुदळ, खोरे इत्यादी (वरील सर्व साधने छोटे व वजनाने हलके) | सामजिक विकास पर्यावरणाशी आत्मियता स्वच्छतेचे संस्कार, शारीरिक विकासात वाढ. |
| ३ | शुक्रवार १५/०७/२०२२ | झाडांचे आळे-वाफे तयार करणे व रोपांना पाणी देणे | खुरपे, कुदळ, खोरे, बदली (सर्व साधने छोटे) | हातांच्या बोटांचा विकास, निसर्गाविषयी प्रेमभावना, रोपांची काळजी घेणे. |
| ४ | शुक्रवार २२/०७/२०२२ | माती व खत चाळणे व कुंड्या भरणे | माती, सेंद्रिय खत, कुंड्या, चळणी | माती व खत यातील फरक, शारीरिक विकास, चाळण्याची व भरण्याची क्षमता प्राप्त. |
| ५ | शुक्रवार २९/०७/२०२२ | बी रूजवने पूर्वतयारी | खुरपे, कुदळ, खोरे, तीननखी इत्यादी (सर्व साधने छोटे) | खुरपे, कुदळ, खोरे इत्यादी. हत्यारे वापरण्याची क्षमता प्राप्त, बागेत काम करण्याचा आनंद प्राप्त, जमीन खोदण्याच्या क्षमतेत विकास. |
| ६ | शुक्रवार ०५/०८/२०२२ | बी रूजवने | मेथीच्या बीया | बी रुजवणे संकल्पना, भाजी उगवत असतानाचे निरिक्षण करण्याची क्षमता प्राप्त. |
| ७ | शुक्रवार १२/०८/२०२२ | बागेतील पाने,फूले, फळे यांचे निरिक्षण करणे | बाग | निरिक्षण क्षमतेत वाढ, फळे, पाने, फुले प्रत्यक्ष हाताळण्याचा आनंद, फळे, पाने, फुले यांच्या मधील फरक ओळखण्याची क्षमता प्राप्त. |
| ८ | शुक्रवार १९/०८/२०२२ | झाडांना खत व पाणी घालणे | खत, पाणी, पाटी, बादली | रोपांविषयी आपुलकी व काळजीची भावना, शरिरीक व सामजिक विकास |
| ९ | शुक्रवार २६/०८/२०२२ | बागेतील पक्षांचे घरटे पहाणे | बाग व घरटे | निरिक्षण क्षमतेचा विकास, पक्षांचे घरटे प्रत्यक्ष पाहण्याचा आनंद प्राप्त. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | शुक्रवार २३/०९/२०२२ | परिसर सहल ( उद्यानास भेट ) | | बागेत जाण्याचा आनंद प्राप्त. |
| ११ | शुक्रवार १६/०९/२०२२ | बागेला पाणी देणे व स्वच्छता करणे | बादली, पाटी, खराटा, खुरपे इत्यादी | स्वच्छतेचे संस्कार प्राप्त, बागेची काळजी घेण्याची क्षमता प्राप्त. |
| १२ | शुक्रवार ३०/०९/२०२२ | शाळेतील छोट्या विहीरीतून रहाटाच्या साहयाने पाणी काढणे व रोपांना पाणी घालणे | छोटी विहीर, बदली आणि दोरा | शारीरिक विकास , विहीरीतून पाणी काढण्याचा  प्रत्यक्ष अनुभव प्राप्त, रहाटाची ओळख. |

## ८.बालकसभा

आठवड्यातील एक दिवस म्हणजेच दर शनिवारी बालक सभा घेण्याचे ठरवले व त्याप्रमाणे घेण्यात आले बालक सभा एका तासाची आयोजित केली बालकसभेमध्ये मुलांना त्याना येत असलेल्या घटकांचे सादरीकरण करावे असे अपेक्षित होते बालक सभेचा मुळ हेतू आहे की बालकांमध्ये समोर येऊन बोलण्याचे धाडस निर्माण करणे, बालकांचा भाषिक विकास करणे त्यांची शब्दसंपदा वाढवणे इत्यादी.

बालकसभेमध्ये शिशुवाटीकेच्या ताईनी ही सहभाग घेतला व सादरीकरण केले हे पाहून बालके स्वतः समोर येउन सादरीकरण करू लागली. ज्या बालकांनी सादरीकरण केले त्याच्यासाठी सर्वांनी टाळया वाजवून प्रोत्साहन दिले हे पाहून समोर येत नसणारी बालकेही समोर येऊ लागली. बालकसभेमध्ये बालकांनी पुढील विषयांवर सादरीकरण केले.

| अनु.क्र. | विषय | क्षमता विकास |
|---|---|---|
| १ | बडबड गीत | भाषिक विकास. |
| २ | अभिनय गीत | अभिनय कौशल्य प्राप्त. |
| ३ | नाटक | शब्दसंपदेत वाढ. |
| ४ | श्लोक | भाषिक विकास, पाठांतर कौशल्य. |
| ५ | गणपतीस्तोत्र | चांगले संस्कार. |
| ६ | प्राण्यांचे आवाज | प्राण्यांच्या आवाजाचा परिचय. |
| ७ | प्राण्यांचे अभिनय | अभिनय कौशल्य प्राप्त. |
| ८ | स्वता:ची ओळख सांगणे. | निरिक्षण क्षमता |
| ९ | जोडीचे शब्द | जोडीच्या शब्दांचा संग्रह झाला. |
| १० | समूहदर्शक शब्द | समुहदर्शक शब्दांचा संग्रह झाला. |

बालकसभेतून मुलांच्या अनेक क्षमतांचा विकास झाला, भाषिक विकास प्रचंड प्रमाणात झाला, शब्द संपदेत वाढ झाली, बालकसभेमुळे ओळीत बसणे, नीट बसणे, सरळ बसणे या क्षमतांचा विकास झाला, बालकांच्या सुप्त गुणांना वाव मिळाला, बालकांचा बौद्धिक विकास झाला, मुलांच्या कलावृत्तीचा विकास झाला धीटपणा वाढला, बोलण्याच्या कौशल्यात वाढ झाली, नृत्याचा आनंद घेता आला, अभिनय कौशल्यात वाढ झाले, सामाजिक विकास झाला व सहकार्याची भावना निर्माण झाली.

## उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण :-

उपक्रम राबविल्यानंतर पुढील प्रमाणे परिणाम दिसून आला

१) बालकांच्या मनात शाळेविषयी आवड निर्माण झाली.

२) बालके न रडता शाळेत येऊ लागली.

३) खेळाद्वारे बालकांचा क्षमता विकास उत्तम झाला .

४) बालकसभेमुळे मुलांच्या बोलण्यात धीटपणा आला.

५) घनिष्ठतम अनुभवामुळे मुलांच्या निसर्गाशी संबंध जुळला.

६) कृतीयुक्त शिक्षणामुळे बालके आनंदाने क्रिया करू लागली.

७) खेळातून मुले केव्हा शिकली हे त्यांनाच समजले नाही.

८) अभिनयगीत छान म्हणू लागली.

९) हजेरीचा खेळ बालकांना आवडू लागला.

## उपक्रमासाठी इतरांची मदत :-

क्षमता विकास वर्ग हा उपक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी मला श्री. अभिजीत भरत गिरमल यांची तांत्रिक कार्यात खूप मोठी मदत झाली. माझ्या शाळेच्या सहाय्यक शिक्षिका सौ. राधा जाधव, सौ. निलम मुसळे, सौ. शुभदा पोवार, सौ. रेश्मा शिंदे, यांची खूप मोठी मदत झाली. तसेच सौ. शरयु माटे यांनी खूपच चांगले मार्गदर्शन केले.

## उपक्रमासाठी सादर कराव्याचे पुरावे

१) दैनिक पाठ नियोजन

२) बालकांची उपस्थिती

३) प्राथमिक मुख्याधापिका अभिप्राय

४) पालक अभिप्राय.

५) प्रगती भावसार यांचा अभिप्राय.


६) उपक्रमाचे फोटो.

७) उपक्रमाचे विडिओ.

८) सर्व उपक्रमांचे स्वतंत्र अहवाल

९) बालकांचे प्रगती पत्रक (क्षमता विकासाचे)

# पुरावा क्र.१:- दैनिक पाठ नियोजन




दैनिक पाठ नियोजन

वार :- सोमवार दिनांक :- 8/6/2022

सुविचार :- नेहमी व्यायाम करावे.

| | |
|---|---|
| वंदना | वंदना घेणे |
| हजेरीचा खेळ | हजेरीचा खेळ घेणे. |
| उपक्रम | उड्यांचे प्रकार. |
| साहित्य | मैदान. |
| पूर्वतयारी | मुलांना उड्या मारता येतात का? त्यांच्या पायांच्या क्षमतांचा विकास झाला आहे का? या गोष्टींची खात्री करून घेतली |
| उद्दिष्टे | 1) सर्वांग व्यायाम करणे. 2) स्थूल स्नायूंचा विकास करणे. |
| कृती | 1) मुलांना मैदानावर नेणे. 2) मुलांना लांब उड्या, ससे उड्या, कांगारू उड्या इ. उड्या मारायला शिकवणे 3) सर्व मुलांना उड्या मारायला सांगणे |
| साध्य | बालकांच्या पायाच्या क्षमतांचा विकास झाला. बालकांच्या स्थूल स्नायूंचा विकास झाला. |
| विशेष नोंद | 1) सुनिल कोबळे हा विद्यार्थी छान उड्या मारतो |




दैनिक पाठ नियोजन

वार :- शुक्रवार दिनांक :- 6/6/2022

सुविचार :- कष्टाविना फळ नाही.

| | |
|---|---|
| वंदना | वंदना घेणे |
| हजेरीचा खेळ | हजेरी घेणे (फळांची नावे) |
| उपक्रम | शाळेच्या बागेची स्वच्छता करणे. |
| साहित्य | खराटा, पाटी, खुरपे, कुदळ खोरे, इ. वरील सर्व साहित्य छोटे असावे. |
| पूर्वतयारी | वरील सर्व साहित्य उपलब्ध करणे. |
| उद्दिष्टे | 1) स्वच्छतेचे संस्कार करणे. |
| कृती | 1) बालकांना बागेत घेऊन जाणे 2) खोरे, खुरपे, पाटी, कुदळ, इ. अवजारांची ओळख करून देणे व हाताळायला देणे 3) स्वच्छता करायला शिकवणे व स्वच्छता करून घेणे |
| साध्य | स्वच्छतेचे संस्कार झाले हाताच्या, पायाच्या, कमरेच्या स्नायूंचा विकास झाला |
| विशेष नोंद | 1) शेतीची अवजारे हाताळायला मिळाले यामुळे बालकांना खूप आनंद झाला. |




दैनिक पाठ नियोजन

वार :- बुधवार दिनांक :- 8/6/2022

सुविचार :- कला म्हणजे एखादी वस्तू नाही तो एक मार्ग आहे

| | |
|---|---|
| वंदना | वंदना घेणे |
| हजेरीचा खेळ | हजेरी घेणे, |
| उपक्रम | चाळणे, कुटणे |
| साहित्य | चाळणी, पीठ, खलबत्ता, शेंगदाणे, ताट, इ. |
| पूर्वतयारी | चाळणी, पीठ, शेंगदाणे, ताट, खलबत्ता. इ. साहित्य उपलब्ध करणे |
| उद्दिष्टे | 1) हाताच्या स्नायूंचा विकास करणे, कृतीत नीटनेटकेपणा आणणे, निरीक्षण कौशल्य वाढवणे |
| कृती | 1) बालकांना गोलाकार बसवणे (गट करून) 2) चाळण्यासाठी पीठ, चाळण व ताट देणे. 3) कुटण्यासाठी खलबत्ता व शेंगदाणे देणे. 4) वरील दोन्ही क्रिया करून दाखवणे. |
| साध्य | 1) बालकांच्या हाताचा व्यायाम झाला 2) स्वयंपाक घरातील काम करण्याची संधी मिळाली. |
| विशेष नोंद | 1) स्वयंपाक घरातील लुडबुड करण्याची इच्छा शाळेत पूर्ण झाली. |




दैनिक पाठ नियोजन


वार :- सोमवार दिनांक :- 11/6/2022


सुविचार :- दृढ संकल्प करूया क्रिडा संस्कृती रूजवूया

| | |
|---|---|
| वंदना | वंदना घेणे. |
| हजेरीचा खेळ | हजेरीचा खेळ घेणे. |
| उपक्रम | भौमितीक आकारावरून चालणे. |
| साहित्य | मैदान, चॉकपीठ |
| पूर्वतयारी | मैदानावर सरळ रेषा, नागमोडी रेषा, चौकोन, त्रिकोण, वर्तुळ. आयत आखून घेणे |
| उद्दिष्टे | तोल सावरत रेषेवरून चालणे, भौमितीक आकार ओळखणे |
| कृती | 1) मुलांना मैदानावर घेऊन जाणे 2) आखलेल्या आकृत्यांची ओळख करून देणे. 3) आकृतीवरून चालून दाखवणे 4) बालकांना आकृतीवरून चालायला सांगणे. |
| साध्य | 1) तोल सांभाळून चालता येऊ लागले. 2) आकृत्यांची ओळख झाली. |
| विशेष नोंद | 1) आकृत्यांवरून वस्तूंची नावे सांगता आली. 2) मैदानावर आखलेले आकार पाहून बालके आनंदी झाली. |

## पुरावा क्र.२:- बालकांची उपस्थिती





सेवाभारती संचलित,
माधव शिशु मंदिर, इचलकरंजी.
सप्टेंबर-२०२२

एकूण दिवस - ३०
कामाचे दिवस - २०
रवि व सुट्टया - १०

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | हजर | गैर |
|---|---|---|---|
| १ | [illegible] | 18 | 02 |
| २ | [illegible] | 18 | 02 |
| ३ | [illegible] | 18 | 02 |
| ४ | [illegible] | 17 | 03 |
| ५ | [illegible] | 19 | 01 |
| ६ | [illegible] | 16 | 04 |
| ७ | [illegible] | 20 | 00 |
| ८ | [illegible] | 20 | 00 |
| ९ | [illegible] | 19 | 01 |
| १० | [illegible] | 18 | 02 |
| ११ | [illegible] | 19 | 01 |
| १२ | [illegible] | 19 | 01 |
| १३ | [illegible] | 18 | 02 |
| १४ | [illegible] | 19 | 01 |
| १५ | [illegible] | 20 | 00 |
| १६ | प्रणव सुतार | 18 | 02 |
| १७ | [illegible] | 20 | 00 |
| १८ | [illegible] | 20 | 00 |
| १९ | [illegible] | 19 | 01 |
| २० | [illegible] | 18 | 02 |
| २१ | [illegible] | 20 | 00 |
| २२ | [illegible] | 18 | 02 |
| २३ | [illegible] | 17 | 03 |
| २४ | [illegible] | 13 | 07 |
| २५ | [illegible] | 16 | 04 |

447

22.35
447
20

$= \frac{22.35 \times 100}{25} = 89.4\%$

सरासरी = 22.35
हजेरी = 89.4 %

## पुरावा क्र.३:- प्राथमिक मुख्याध्यापिका अभिप्राय.

# अभिप्राय

मी सौ. स्वाती दादासो शिंदे, माधव विद्या मंदिर, इचलकरंजी येथे गेल्या अकरा वर्षांपासून कार्यरत असून सौ. अस्मिता ठिकणे या गेल्या दहा वर्षांपासून माझ्या सहाय्यक शिक्षिका आहेत. अतिशय धडपडी, प्रयोगशील व उपक्रमशील असे त्यांचे व्यक्तिमत्त्व आहे. यांनी राबवलेला 'क्षमता विकास वर्ग' हा नवोपक्रम स्तुत्य आहे.

इमारतीचा पाया जितका मजबूत असतो, तितकीच इमारत मजबूत होते. त्यामुळे शिशु वर्गातच विद्यार्थ्यांचा बौद्धिक, मानसिक, सामाजिक, शारीरिक विकास योग्य प्रकारे झाला तर पुढील वाटचालीत विद्यार्थ्याला मदत होते. त्यादृष्टीने सौ. अस्मिता ठिकणे यांनी राबवलेला उपक्रम व त्याअंतर्गत घेतलेले क्रियाकलाप अतिशय उपयुक्त व सुंदर आहेत.

सौ. अस्मिता ठिकणे यांनी राबवलेल्या या नवोपक्रमामुळे नक्कीच विद्यार्थ्यांना इ. १ ली मध्ये प्रवेश केल्यानंतर उपयोग होईल. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास सुखकर होईल. त्यांच्या पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा!

Shinde

प्र. मुख्याध्यापक,
माधव विद्यामंदिर,
इचलकरंजी.

## पुरावा क्र.४:- पालक अभिप्राय.

॥ श्री राम ॥

नाव - सौ स्वाती मदन लोके

माझ्या मुलग्याचे नाव आर्य मदन लोके आहे. तो माधव विद्यामंदिर मध्ये मोठ्या गटात शिकत आहे बाल विकास वर्गाअंतर्गत त्याच्या वर्गात अनेक उपक्रम घेण्यात आले. त्यामध्ये रंगांची ओळख करून घेणे, मातीची खेळणी बनवणे, मातीचा नागोबा तयार करणे, कागदाची नाव तयार करणे, रुमालाची घडी करणे, मुखवट्याचा वापर करून गोष्टींचे पात्र करणे, गोष्ट सांगणे, बडबडगीते म्हणणे, पसायदान म्हणणे, शुभंकरोती दररोज संध्याकाळी म्हणून दररोज मोठ्यांच्या पाया पडणे, मुलांना वेगवेगळ्या पालेभाज्या ओळखायला सांगून त्यांना त्या निवडायला सांगणे. बटाटा सोलायला देणे, कडधान्यांची ओळख, वेगवेगळ्या चवींची ओळख करून देणे, सर्व फळभाज्यांची ओळख करून घेणे, मुळाक्षरांची ओळख, अंक ओळख, राखी बनवणे. यासारखे अनेक उपक्रम घेण्यात आले होते. त्यामुळे आमच्या पाल्यामध्ये मोठ्या प्रमाणात शारिरिक व बौद्धिक विकास घडून आलेला आहे.

या सर्व उपक्रमांच्या माध्यमातून मुलांमध्ये मोठ्या प्रमाणात बौद्धीक विकास घडून आलेला आहे. त्यांची पाठांतर क्षमता वाढलेली आहे. त्यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात बदल दिसून येत आहेत. शारिरिक विकासामध्ये पण या उपक्रमांचा मोठा हातभार आहे कारण या उपक्रमांतर्गत वास, चव, शारिरिक खेळ मोठ्या प्रमाणात घेण्यात आले होते त्यामुळे त्यांच्या ज्ञानेंद्रियांच्या ज्ञानामध्ये मोठ्या प्रमाणात भर पडलेली आहे. असेच अनेक उपक्रम शाळेमध्ये घेतले जावेत कारण यामुळे मुलांचा सर्वांगिण विकास होण्यास मदत होते.

धन्यवाद।

## पुरावा क्र. ५ :- प्रगती भावसार यांचा अभिप्राय

प्रिय अस्मिता ताई ठिकणे.

अस्मिता ताई खूपच स्तुत्य उपक्रम आहे.

दोन वर्षां नंतर आता मुले शाळेत येत आहेत. त्यामुळे शाळा परत एकदा फुलली आहे. जी पाच वर्षाची मुले शिशुवाटिकेत आली यावर्षी , त्यांचा जो क्षमता विकास होणे गरजेचा आहे तो झालेला नाही. त्यासाठी तुम्ही त्यांच्याकडून ही जी विशेष तयारी करून घेत आहात ते खूप कौतुकास्पद आहे. शारीरिक विकास, प्राणिक विकास, मानसिक विकास, बौद्धिक विकास, अध्यात्मिक विकास आणि भाषिक विकास यासाठी तुम्ही वेगवेगळ्या खेळाच्या माध्यमातून कर्मेंद्रिय, प्राण, मन, बुद्धी व भाषेचा वि कास होतांना दिसत आहे.याचबरोबर बागकाम, दैनंदिन जीवन व्यवहार, वेगवेगळी कौशल्य, बालक सभा यातून मुलांचा क्षमता विकास व जीवनाचा घनिष्ठ अनुभव क्रियाकलापाच्या माध्यमातून मुलांना मिळत आहे. यामुळे दोन वर्षां त जे मुलांनी गमावले ते तुम्ही भरून काढत आहात. ही छोटी मुलं छान तयार होत आहेत. आपल्या सारख्या आचार्य यामुलांना मिळेल हे भाग्य आहे. तुमच्या या उपक्रमास शुभेच्छा...



प्रगती भावसार
विद्याभारती पश्चिम महाराष्ट्र
प्रांत कार्यकारिणी सदस्य

## पुरावा क्र.६ :- उपक्रमाचे फोटो

**आकारावरुन चालणे :-**



**विहिरीतून पाणी काढणे :-**



रुमालापासून घडीकाम :-



पक्षांच्या घरट्यांची ओळख :-



**पोहण्याच्या तलावात खेळणे :-**



**जीवन व्यवहार**





## पुरावा क्र.७ :- उपक्रमाचे विडियो


https://youtu.be/oZQohe5YDNc


https://youtu.be/BaHo4pzylWA

## पुरावा क्र.८ :- सर्व उपक्रमांचे स्वतंत्र अहवाल



## पुरावा क्र.९ :- बालकांचे प्रगती पत्रक (क्षमता विकासाचे)

### सेवाभारती संचलित, माधव शिशु मंदिर, इचलकरंजी.

जुलै-२०२२

| अ.क्र. | विद्यार्थीचे नाव | शारीरिक विकास | | | | बौद्धिक विकास | | | | मानसिक विकास | | | | भाषिक विकास | | | | सामाजिक विकास | | | | आत्मिक विकास | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कमी | बरा | चांगले | उत्तम | कमी | बरा | चांगले | उत्तम | कमी | बरा | चांगले | उत्तम | कमी | बरा | चांगले | उत्तम | कमी | बरा | चांगले | उत्तम | कमी | बरा | चांगले | उत्तम |
| १ | स्वराली मोरे | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | | ✔ | | | ✔ | | | | ✔ | | |
| २ | आदिती हिरटे | | ✔ | | | | | | | ✔ | | | | | ✔ | | | | | ✔ | | ✔ | | | |
| ३ | पूर्वा घेरुडकर | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | |
| ४ | स्वरांजली इगळे | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | |
| ५ | वैष्णवी परिट | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | | ✔ | | | ✔ | | | | ✔ | | |
| ६ | शरण्या मडके | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | |
| ७ | शिवानी पुजारी | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ | | | | | ✔ | | ✔ | | | |
| ८ | स्वरदा चौगुले | | ✔ | | | | | ✔ | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | |
| ९ | वसुंदरा आडकी | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | |
| १० | मिताली दवंडे | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | |
| ११ | स्वानंदी सुरपुरे | ✔ | | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | | ✔ | | | ✔ | | |
| १२ | जान्हवी मुदगल | | ✔ | | | | | ✔ | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | |
| १३ | मनवा मडके | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | |
| १४ | सिद्धी मोरे | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | |
| १५ | शिवगामिणी आवळकर | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | |
| १६ | प्रणव सुतार | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | | ✔ | | | ✔ | | |
| १७ | सुनिल कांबळे | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | | | | ✔ | | | ✔ | | | | ✔ | | |
| १८ | आर्य लोले | | ✔ | | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | |
| १९ | स्वराज लाड | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | |
| २० | गौरव सुरंगे | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | |
| २१ | अवनीश सवाईराम | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | |
| २२ | यशोदिप पाटिल | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | |
| २३ | शिवंश पानरी | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | | ✔ | | | ✔ | | | ✔ | | | |
| २४ | ओम मुदगल | | ✔ | | | | | ✔ | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | |
| २५ | आरव परिट | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | |

### सेवाभारती संचलित, माधव शिशु मंदिर, इचलकरंजी.

ऑगस्ट-२०२२

| अ.क्र. | विद्यार्थीचे नाव | शारीरिक विकास | | | | बौद्धिक विकास | | | | मानसिक विकास | | | | भाषिक विकास | | | | सामाजिक विकास | | | | आत्मिक विकास | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कमी | बरा | चांगले | उत्तम | कमी | बरा | चांगले | उत्तम | कमी | बरा | चांगले | उत्तम | कमी | बरा | चांगले | उत्तम | कमी | बरा | चांगले | उत्तम | कमी | बरा | चांगले | उत्तम |
| १ | स्वराली मोरे | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | |
| २ | आदिती हिरटे | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ | | | | ✔ | |
| ३ | पूर्वा घेरुडकर | | | ✔ | | | | | ✔ | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | |
| ४ | स्वरांजली इगळे | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | |
| ५ | वैष्णवी परिट | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | |
| ६ | शरण्या मडके | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | |
| ७ | शिवानी पुजारी | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | |
| ८ | स्वरदा चौगुले | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | |
| ९ | वसुंदरा आडकी | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | |
| १० | मिताली दर्वडे | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | |
| ११ | स्वानंदी सुरपुरे | | ✔ | | | | ✔ | | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | |
| १२ | जान्हवी मुदगल | | | ✔ | | | | | ✔ | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | |
| १३ | मनवा मडके | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | |
| १४ | सिद्धी मोरे | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ | | | | ✔ | |
| १५ | शिवगामिणी आवळकर | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | |
| १६ | प्रणव सुतार | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | |
| १७ | सुनिल कांबळे | | | ✔ | | | | | ✔ | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ | |
| १८ | आर्य लोले | | | ✔ | | | | | ✔ | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | |
| १९ | स्वराज लाड | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | |
| २० | गौरव सुरंगे | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | |
| २१ | अवनीश सवाईराम | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | |
| २२ | यशोदिप पाटिल | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | |
| २३ | शिवंश पानरी | | | ✔ | | | | | ✔ | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | |
| २४ | ओम मुदगल | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | |
| २५ | आरव परिट | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ | | | | ✔ | |

# सेवाभारती संचलित, माधव शिशु मंदिर, इचलकरंजी.

### सप्टेंबर-२०२२

| अ.क्र. | विद्यार्थीचे नाव | शारीरिक विकास | | | | बौद्धिक विकास | | | | मानसिक विकास | | | | भाषिक विकास | | | | सामाजिक विकास | | | | आत्मिक विकास | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कमी | बरा | चांगले | उत्तम | कमी | बरा | चांगले | उत्तम | कमी | बरा | चांगले | उत्तम | कमी | बरा | चांगले | उत्तम | कमी | बरा | चांगले | उत्तम | कमी | बरा | चांगले | उत्तम |
| १ | स्वराली मोरे | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ |
| २ | आदिती हिरटे | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ |
| ३ | पूर्वा येरुडकर | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ |
| ४ | स्वरांजली इगळे | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ |
| ५ | वैष्णवी परिट | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | |
| ६ | शरण्या मडके | | | ✔ | | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ |
| ७ | शिवानी पुजारी | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ |
| ८ | स्वरदा चौगुले | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ | | | | ✔ |
| ९ | वसुंदरा आडकी | | | ✔ | | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ |
| १० | मिताली दवंडे | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | |
| ११ | स्वानंदी सुरपुरे | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ | | | | ✔ |
| १२ | जान्हवी मुदगल | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ |
| १३ | मनवा मडके | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ |
| १४ | सिद्धी मोरे | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ |
| १५ | शिवगामिणी आवळकर | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ |
| १६ | प्रणव सुतार | | | ✔ | | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | |
| १७ | सूनिल कांबळे | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ |
| १८ | आर्य लोले | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ |
| १९ | स्वराज लाड | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ |
| २० | गौरव सुरंगे | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ | | | | ✔ |
| २१ | अवनीश सवाईराम | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ |
| २२ | यशोदिप पाटिल | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ |
| २३ | शिवंश पानरी | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ |
| २४ | ओम मुदगल | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | ✔ | | | | | ✔ |
| २५ | आरव परिट | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ | | | | ✔ |

# उपक्रमाची कार्यपद्धती

## पूर्वस्थितीचे निरीक्षण व त्यांच्या नोंदी

मुलांना शिकवत असताना असे लक्षात आले की, मुलांना अभ्यासात गोडी नाही एका ठिकाणी बसुन लक्षपूर्वक, अभ्यास करणे,एकणे याची आवड या बालकांना नाही, काही ना काही चुळबूळ या मुलांमध्ये चाललेली असते किंवा आपापसात खेळ खेळने यांच्यात चालू असते दर वेळेस काहीतरी वेगळे करायला या मुलांना आवडते असे लक्षात आले. एक सारखी कृती मुलांना वारंवार करायला सांगितले तर ती मुले कंटाळतात म्हणून सतत वेगवेगळे क्रियाकलाप घ्यायचे ठरवले व यातून क्षमता विकास वर्ग सुरू केला.

## कार्यवाही दरम्यान निरीक्षणे व संकलन

क्षमता विकास वर्ग प्रत्यक्षात सुरू झाल्यानंतर केलेल्या वेळापत्रका प्रमाणे उपक्रम होतात का? बालक प्रत्यक्ष अनुभव घेते का? बालकाला उपक्रम आवडत आहेत का? या उपक्रमाविषयी पालकांचे मत काय आहे? या सर्वाचे निरीक्षण केले आणि या सर्व माझ्या प्रश्नांची उत्तरे होकारर्थी आली त्यामुळे मला खूपच आनंद झाला व पुढील उपक्रम घेण्यासाठी प्रोत्साहनही मिळाले. उपक्रम होत असताना बालकांमधील काही बदल लक्षात आले ते पुढीलप्रमाणे...

- बालकांच्या हातांच्या व पायांच्या क्षमता विकसित होत आहेत.
- बालक रांगोळी काढण्याचा प्रयत्न करत आहे.
- बौद्धीक खेळामुळे बालकांच्या स्मरणशक्तीमध्ये वाढ होत आहे.
- शाळेविषयी आपुलकीची भावना निर्माण होत आहे.
- बालके बागकाम खूपच आवडीने करत आहेत.
- मातीत खेळण्याची संधी दिल्यामुळे बालकांना खुपच आनंद होत आहे.
- बालक मनसोक्त मातीत खेळत आहेत.
- बालकांच्या सुप्त गुणांना वाव मिळत आहे.
- शाळेमध्ये बनवलेली छोटी विहीर बालकांना खूपच आवडते ते नेहमी विहीरीच्या आवतीभोवती असतात .

## उपक्रम पूर्ण झाल्यावर निरीक्षण नोंदी

१ जुलै २०२२ ते ३० सप्टेंबर २०२२ या तीन महिन्याच्या कालावधीमध्ये क्षमता विकास वर्ग हा उपक्रम मोठ्यागटाच्या बालकांसाठी घेण्यात आला उपक्रम पूर्ण झाल्यानंतर बालकांच्या क्षमतांचा मोठ्याप्रमाणात विकास झाला असे लक्षात आले विकासाच्या नोंदी पुढीलप्रमाणे...

### शारीरिक विकास

बालकांचा  शारीरिक विकास उत्तम झाला सरळ चालणे, नागमोडी रेषेवरून चालणे, विटावरून तोल सावरत चालणे, भौमितिक आकारावरून चालणे, वस्तू पकडणे,  ढकलणे, दाबणे, शाळेच्या बागेत दोरीच्या सहायाने झोके घेणे, कोलाट्या उड्या, बेडूक उड्या, ससे उड्या मारणे  यातून हातांच्या व पायांच्या स्नायूंचा विकास झाला.

### भाषिक विकास

बालकांचा भाषिक विकास उत्तम झाला. बालक पूर्ण वाक्यात बोलायला शिकले तसेच श्लोक, बडबडगीते, गाणी, गोष्टी सांगू लागली, मनसोक्त माझ्याशी गप्पा मारू लागली स्वताचे नाव सांगता येऊ लागले.

### मानसिक विकास

फूलांचा हार करणे, चित्र ओळखणे, नेम धरणे, चित्र काढणे, मनी ओवणे या सर्व क्रियाकलापामधून बालकांचा मानसिक विकास फारच छान झाला.

### सामाजिक विकास

बालकामध्ये सामाजिक विकासाची मुल्ये रुजविणे खूपच महत्वाचे आहे कारण पुढे जाऊन हीच  बालके भारताचे सुजान व सुसंस्कृत नागरीक होणार आहेत म्हणूनच शाळेमध्ये पक्षांना खाऊ देणे, एकमेकांना मदत करणे, एकत्र खेळणे,रोपांना पाणी देणे या गोष्टीचे शिक्षण दिले या सर्व गोष्टी बालकांनी आत्मसात केल्या.

### बौद्धिक विकास

बालकांचा बौद्धिक विकास हा उत्तम  झाला आहे धूळ पाटीवर अक्षरे गिरविणे, मैदानावर चित्रे काढणे, स्मरणशक्तीचा खेळ, हजेरीचा खेळ उत्तमरित्या बालके खेळतात.

## कार्यवाहीत आलेल्या अडचणी

उपक्रम घेत असताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले  त्यातील काही अडचणी.

### पालक :-

क्षमता विकासाचे महत्व पालकांना माहित नव्हते म्हणून उपक्रमात अडचणी येत होत्या. उपक्रमांवर पालकांचा विश्वास नव्हता.

**आवश्यक साधने :-**

उपक्रमासाठी जास्तीत जास्त साहित्य हे सहज उपलब्ध होणारे घेण्यात आले होते पण एक छोटी विहीर मला अपेक्षित होती ती होण्यासाठी अडचणी आल्या म्हणजेच विहीर बांधण्यासाठी साहित्य व कामगार लवकर मिळाले नाही विहीर छोटी आहे पण तरीही बालकांच्या सुरक्षिततेचा विचार करणे गरजेचे आहे.

**बालकांची मानसिकता :-**

उपक्रम सुरु केल्यानंतर सुरुवातीला बालकांची मानसिकता नव्हती आईचे बोट सोडून आलेली ही बालके शाळेत रमत नव्हती.

## अडचणींवर उपाय

उपक्रम घेत असताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले पण या अडचणींवर ही उपाय शोधले व हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला.

**पालक :-**

पालक मेळावा घेऊन क्षमता विकासाचे महत्व पटवून दिले, पालकांसाठी प्रात्यक्षिक घेतले व पालकांचा विश्वास मिळवला.

**आवश्यक साधने :-**


शाळेचे संचालक मा. श्री. कुलकर्णी सर व मा.श्री.गणपुले सर यांच्या ओळखीने साहित्य व कामगार मिळाले व विहीरीचे काम सुरू झाले विहीरीपासून सुरक्षिततेचा विचार करूनच बांधकाम केले. विहीरीच्या वरच्या बाजूस जाळी बसवली. त्यामुळे बालकांसाठी कोणताही धोका नाही. पाणी काढण्यासाठी विहीरीत रहाट बसवले.

**बालकांची मानसिकता :-**

बालकांना आवडतील व त्यांना आनंद मिळेल अशा रितीने सुरुवातीचे काही दिवस उपक्रम घेण्यात आले, हळू-हळू बालके शाळेत रमू लागली. शाळेत बसण्याची त्यांची क्षमता विकसित झाली.

# माहितीचे विश्लेषण

| महिना | जुलै | ऑगस्ट | सेप्टेंबर |
|---|---|---|---|
| उपस्थिती | ४६.६१ | ७४.०८ | ८९.०४ |
| क्षमता विकास | ३० | ६५ | ९० |



# नवोपक्रमाची यशस्विता

क्षमता विकसित वर्गाची निर्मिती करून त्यांचा प्रभावी व यशस्वी वापर मी  करू शकले बालकांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी या उपक्रमाची खूप मोठी मदत झाली.

- खेळ-कूद समारंभ या उपक्रमातून मुलांचा शारीरिक विकास तर झालाच याशिवाय मुलांमध्ये खेळा विषयी आवड निर्माण झाली एकमेकांना समजावून घेत एकत्र खेळण्याची वृत्ती मुलांच्या मनामध्ये निर्माण झाली. वेगवेगळे खेळ त्यांना खेळता येऊ लागले खेळातून भाषा, गणित व विज्ञान या विषयाचे ज्ञान बालकांना प्राप्त झाले.

- जीवन व्यवहार क्रियाकलापातून स्वयंपाकघरातील घटकांची चांगली ओळख झाली वेगवेगळया चवी प्रत्यक्ष चाखून बघितल्यामुळे चवी उत्तम लक्षात राहिला याशिवाय स्वयंपाकघरात जाऊन काम करण्याची बालकांची अपूर्ण इच्छा शाळेत पूर्ण झाली.

- घनिष्टतम अनुभवातील क्रियाकलापामुळे बालकांचा माती, पाणी, वारा, आकाश व सूर्यप्रकाश यांच्या प्रतेक्ष संबंध जुळला व त्यांच्या ज्ञानेंद्रीयांचा व कर्मेंद्रियांचा विकास उत्तम प्रकारे झाला.

- कौशल्य विकास उपक्रमामुळे बालकांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळाला बालक स्वताच्या कल्पनेने रांगोळी काढू लागले, रंगीत कणकेची खेळणी बनवू लागले तसेच काहीतरी केल्यानंतर शाबासकी मिळते हा त्यांच्यासाठी एक अनोखा अनुभव बनला या उपक्रमातून स्वनिर्मितीचा आनंद बालकाला घेता आला.

- बालकसभेमुळे बालकांमध्ये पुढे येऊन बोलण्यात धीटपणा आला. बोलण्यामध्ये आत्मविश्वास वाढला बालकाचा भाषिक विकास उत्तम झाला.

- बालक आवडीने बागेमध्ये काम करू लागले बागेची स्वछता करू लागले बागकामामुळे शेतीच्या आवजारांची त्याला ओळख झाली.

- हजेरीच्या खेळामुळे बालकांची बौद्धिक क्षमता खूपच वाढली सामन्य तान हा विषय हजेरीच्या खेळातूनच घेण्यात आला बालकांना अभ्यासाचे व पाठांतराचे ज्ञान आले नाही आपोआपच वार, महिने, दिशा, ऋतू, प्राणी, पक्षी इत्यादींची नावे समजली.

- क्षमता विकास वर्गातील रोजच्या नविन उपक्रमांमुळे बालके शाळेत रमू लागली व हळू-हळू माझ्यात व बालकांच्यात खूपच जवळचे मैत्रीपूर्ण नाते निर्माण झाले.
- क्रियाकलापामधून बालकांच्या पंचकोषांचा विकास झाला.

**उदा.** १) विहिरीतून पाणी काढणे.

अ) **अन्नमयकोश :-** विहिरीतून पाणी कढल्यामुळे शारीरिक व्यायाम झाला त्यामुळे भूक लागली.

आ) **प्राणमयकोश :-** विहिरीतून पाणी काढताना श्वसनाचा व्यायाम झाला.

इ) **मनोरमयकोश :-** विहिरीतून पाणी काढत असताना मन एकाग्र झाले. बादली भरून वर ओढण्यात लक्ष केंद्रित झाले.

ई) **विज्ञानमयकोश :-** रिकामी बादली वर भरून आली. रहाटाचा वापर केला.

उ) **आनंदमयकोश :-** वरील सर्व क्रिया स्वत: करण्याचा आनंद प्राप्त झाला.

# समारोप

S.C.E.R.T च्या वतीने आयोजित राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन २०२२-२३ मध्ये सहभागी होताना मला खूप आनंद होत आहे. गेली अनेक वर्षे माझी नवोपक्रमात सहभागी होण्याची इच्छा होती. बक्षिस मिळविणे हा उद्देश नाही परंतू या निमित्ताने आपण केलेल्या उपक्रमाकडे शास्त्रीय दृष्टीने पाहता आले व शिशु शिक्षणाचे महत्व इतरांना पटवून देता आले नवोपक्रमामुळे एखाद्या उपक्रमाचा इतका विस्तृत अहवाल लिहता येतो हे मी यातून शिकले. उपक्रमामुळे वाचन, चिंतन, मनन करता आले. इतरांशी चर्चा करता आले व या सर्वातून क्षमतांच्या विकासातील माझे ज्ञान आजूनच वाढले. क्षमता विकास वर्गामळे पूर्व प्राथमिक वर्गात शिकत असलेल्या बालकांचा सर्वांगीण विकास उत्तम प्रकारे झाला.

नवोपक्रमामध्ये मला प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या मदत केलेल्या सर्वांचे मन: पूर्वक आभार.

धन्यवाद.!

# संदर्भ व परिशीष्टे

| अ.क्र. | पुस्तकाचे नाव | लेखक |
|---|---|---|
| १ | शिशुवाटिका तत्व आणि व्यवहार | इंदुमती काटदरे |
| २ | आदर्श बालवाडी ट्रेनिंग डिप्लोमा | - |

URL Links :-

१. https://youtube.be//ipl_b17Tjsg

२. https://youtube.be//o_ugn2zipAY